दैनिक
# प्रजाशाहीचा आवाज

RNI NO. MAHMAR/2025/89502

मुख्य संपादक : वैभव एस.धबडगे

हिंगोली-महाराष्ट्र | वर्ष : ३ रे । अंक : ५८ । | मंगळवार १४ एप्रिल २०२६ | पाने : ४ | किंमत २ रूपये

# भारत २१ व्या शतकातील महत्त्वपूर्ण निर्णयाच्या उंबरठ्यावर

## महिला आरक्षण कायद्याबाबत पंतप्रधान मोदी यांचे प्रतिपादन

**नवी दिल्ली, दि. १३ -** २१ व्या शतकातील सर्वात महत्त्वपूर्ण निर्णयांपैकी एक निर्णय घेण्याच्या उंबरठ्यावर भारत उभा आहे; कारण दशकांपासूनची प्रतीक्षा संपवण्यासाठी आणि महिला आरक्षण कायद्यात सुधारणा करून त्याची अंमलबजावणी २०२९ मध्ये सुनिश्चित करण्यासाठी संसदेचे अधिवेशन भरत आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी सांगितले.

१६ एप्रिलपासून सुरू होणाऱ्या संसदेच्या तीन दिवसीय विशेष अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर, येथे आयोजित महिलांच्या एका परिषदेला संबोधित करताना मोदी म्हणाले की, नारी शक्ती वंदन अधिनियमातील सुधारणेमुळे भूतकाळातील संकल्पना साकार होतील आणि भविष्यातील संकल्पांची पूर्तता होईल. यावेळी त्यांनी प्रशासनातील महिलांच्या योगदानाचे कौतुक केले आणि अनेक महिला



मोठ्या भूमिका पार पाडण्यासाठी सज्ज व उत्सुक असल्याचे ठामपणे सांगितले.

आपल्या देशाची संसद एक नवा इतिहास घडवण्याच्या अगदी जवळ आहे. असा नवा इतिहास, जो भूतकाळातील संकल्पनांना मूर्त रूप देईल; जो भविष्यातील संकल्पांची पूर्तता करेल. एका समतावादी भारताचा संकल्प, जिथे सामाजिक न्याय हा केवळ एक पोकळ नारा न राहता, आपल्या कार्यसंस्कृतीचा आणि निर्णय प्रक्रियेचा एक नैसर्गिक भाग असेल, असे ते म्हणाले. जेव्हा हा कायदा २०२३ मध्ये मांडण्यात आला होता, तेव्हा सर्व पक्षांनी तो एकमताने मंजूर केला होता. तसेच, विशेषतः विरोधी पक्षांकडून, २०२९ पर्यंत त्याची अंमलबजावणी करण्याची सामूहिक मागणी करण्यात आली होती.

पंतप्रधानांनी सांगितले की, राज्यांच्या विधानसभांपासून ते देशाच्या संसदेपर्यंत, दशकांपासूनची प्रतीक्षा संपवण्याची वेळ आता १६, १७ आणि १८ एप्रिल रोजी आली आहे; कारण या सुधारणांवर विचार करण्यासाठी आणि त्या मंजूर करण्यासाठी संसदेचे विस्तारित अर्थसंकल्पीय

(पान २) ▸▸

# केरळच्या मतदान आकडेवारीवरून कुरुक्षेत्र

## डावे, काँग्रेस आक्रमक : आयोगाचे मौन अनाकलनीय

**तिरुवनंतपुरम, दि. १३ -** केरळमध्ये विधानसभा निवडणुकांसाठी मतदान पार पडल्यानंतर अनेक दिवस उलटूनही मतदानाची सविस्तर आणि अंतिम आकडेवारी जाहीर न झाल्याने राजकीय वातावरण तापले आहे. सविस्तर आकडेवारी देण्यास निवडणूक आयोगाकडून होत असलेल्या विलंबाबाबत सत्ताधारी कम्युनिस्ट आणि विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसने तीव्र नाराजी व्यक्त करत आयोगाला या संदर्भात जाब विचारला आहे.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व्ही. डी. सतीशन यांनी मुख्य निवडणूक आयुक्तांना पत्र लिहून या विलंबावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. ९ एप्रिल रोजी मतदान प्रक्रिया पूर्ण होऊन तीन दिवस उलटले तरी मतदारसंघनिहाय आकडेवारी, मतांची टक्केवारी आणि टपाल मतपत्रिकांची (पोस्टल बॅलेट्स) माहिती आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध नसल्याचे त्यांनी पत्रात नमूद केले. निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि जनतेचा विश्वास कायम राखण्यासाठी ही माहिती त्वरित सार्वजनिक करणे आवश्यक असल्याचे सतीशन यांनी म्हटले आहे.

दुसरीकडे, सत्ताधारी कम्युनिस्ट नेते आणि मंत्री व्ही. शिवनकुट्टी यांनी या प्रकाराला असामान्य म्हटले आहे. पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले की, प्रगत तंत्रज्ञानाच्या युगात ईव्हीएम, सेवा मते आणि टपाल मतांची एकत्रित आकडेवारी संकलित करण्यास

(पान २) ▸▸

# आरफळ खूनप्रकरणी संशयिताला तीन दिवस पोलीस कोठडी

**सातारा, दि. १३ (प्रतिनिधी)** - वाहनातील पेट्रोल काढण्यावरून झालेल्या वादातून आरफळ (ता. सातारा) येथे अमर नलगे यांचा खून केल्याप्रकरणी संशयित ऋषीकेश कासकर याला न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

नलगे यांचा खून करून कासकर पळून गेला होता. त्याच्या शोधासाठी सातारा तालुका पोलिसांची पथके रवान करण्यात आली होती. कासकर हा शिवथर येथील एका शेतात लपून बसल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी त्याला जेरबंद केले. त्याला सोमवारी सातारा जिल्हा व सत्र न्यायालयात हजर करण्यात आले असता, तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली.


# १५ एप्रिलला विरोधी पक्षांची महत्त्वाची बैठक


**महिला आरक्षणावर करणार चर्चा, काँग्रेस अध्यक्ष खर्गे यांची माहिती**


**बंगळुरू, दि.१३-** महिला आरक्षण कायद्याच्या (नारी शक्ती वंदन अधिनियम) अंमलबजावणीबाबत चर्चा करण्यासाठी काँग्रेसने १५ एप्रिल रोजी सर्व विरोधी पक्षांची विशेष बैठक बोलावली आहे. केंद्र सरकार या महत्त्वाच्या विषयावर सर्वसमावेशक चर्चा करण्यास तयार नसल्याचा आरोप काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी सोमवारी येथे केला. खर्गे म्हणाले की, महिला आरक्षणाला काँग्रेसचा पूर्ण पाठिंबा आहे, परंतु त्याच्या अंमलबजावणीचे राष्ट्रीय स्तरावर व्यापक परिणाम होणार असल्याने त्यापूर्वी सविस्तर चर्चेची गरज आहे. केंद्र सरकारने बोलावलेल्या बैठकीबाबत पंतप्रधान किंवा संसदीय कामकाज मंत्र्यांनी लिहिलेल्या पत्राला आपण आधीच उत्तर दिले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सरकारने सर्व पक्षांना विश्वासात घेऊन चर्चा घडवून आणली असती तर आम्ही आमची मते मांडली असती, मात्र सरकारची तशी मानसिकता नसल्याने विरोधी पक्षांना एकत्र येऊन आपली रणनीती ठरवावी लागत आहे. १५ एप्रिलच्या बैठकीत जो काही सामूहिक निर्णय होईल, तो सरकारला कळवला जाईल, असेही खर्गे यांनी नमूद केले.


काँग्रेसने नेहमीच महिला आरक्षणाचे समर्थन केले आहे. सोनिया गांधी

(पान २) ▸▸






## पंतप्रधानांकडून जालियनवाला हुतात्म्यांना भावपूर्ण श्रद्धांजली

नवी दिल्ली, दि. १३ - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी १९१९ मधील जालियनवाला बाग हत्याकांडातील हुतात्म्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. हुतात्म्यांचे बलिदान भारतीय जनतेच्या अदम्य जिद्दीची प्रबळ आठवण म्हणून कायम राहील, अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

आपल्या अधिकृत सोशल मिडियावरुन केलेल्या पोस्टमध्ये पंतप्रधान मोदी म्हणाले की, परकीय राजवटीच्या क्रूरतेविरुद्ध या शूरवीरांनी दाखवलेले धैर्य, स्वाभिमान आणि दृढनिश्चय देशाच्या प्रत्येक पिढीला स्वातंत्र्य, न्याय आणि सन्मान या मूल्यांच्या जतनासाठी सतत प्रेरणा देत राहील.

१३ एप्रिल १९१९ रोजी अमृतसर येथे रौलट कायद्याविरुद्ध शांततेने निदर्शने करणाऱ्या निशस्त्र नागरिकांवर ब्रिटिश सैन्याने अमानुष गोळीबार केला होता. या भीषण हत्याकांडात शेकडो निष्पाप नागरिकांचा बळी गेला. अधिकृत आकडेवारीनुसार मृतांची संख्या ३७९ असली, तरी प्रत्यक्ष मृतांचा आकडा यापेक्षा कितीतरी पट अधिक असल्याचा दावा स्वातंत्र्य चळवळीतील नेत्यांनी केला होता.






महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्ताने रात्री १२ वाजता भव्य फटाक्याची आतषबाजी आणि नाईट शो करण्यात आले, पुणे









## जेईई मुख्य परीक्षेची उत्तरतालिका प्रसिद्ध

**पुणे, दि. १३ -** अभियांत्रिकी प्रवेशासाठी महत्त्वाची असलेल्या जेईई मुख्य सत्र २ परीक्षेची तात्पुरती उत्तरतालिका राष्ट्रीय चाचणी संस्थेने प्रसिद्ध केली आहे. २ ते ८ एप्रिल दरम्यान पार पडलेल्या या परीक्षेची विद्यार्थी आतुरतेने वाट पाहात होते. उमेदवारांना आता अधिकृत संकेतस्थळावर आपला अर्ज क्रमांक आणि पासवर्ड वापरून ही उत्तरतालिका पाहता येईल. या परीक्षेचा निकाल साधारणपणे २० एप्रिलपर्यंत जाहीर होण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांनी वेळोवेळी अधिकृत वेबसाईटला भेट द्यावी, असे आवाहन राष्ट्रीय चाचणी संस्थेने केले आहे.

व्हॉटस्ॲप अंक मिळणेसाठी 9822 474 807 वर संपर्क करा!




# कात्रजमध्ये पीएमपी बसचा टोइंग बेल्ट तुटल्याने थरार

**कात्रज, दि. १३ (प्रतिनिधी)** - कात्रज चौकातील जयक्रांती विद्यालय शेजारी चढावरील रस्त्यावर रविवारी (दि.१२) रात्री ११ च्या सुमारास भीषण अपघात घडला. पीएमपीची बंद पडलेली बस टोईंग करून नेत असताना टोईंग बेल्ट तुटला, उतारावर बस पाठीमागे (रिव्हर्स) आल्याने बसमागील दोन दुचाकींना धडक बसली. या अपघातात चाकाखाली सापडून दुचाकींचे मोठे नुकसान झाले, तर दोन्ही चालक व सहप्रवासी थोडक्यात बचावले.

## अपघातात सुदैवाने जीवितहानी टळली

दत्तनगरकडून कात्रजकडे बंद पडलेली बस (क्र. एमएच १२ क्यूजी ४४१९) ओढून नेत असताना हा अपघात घडला. अपघातानंतर टोइंग करणाऱ्या वाहनाचा चालक घटनास्थळावरून पळून गेला. रस्त्याच्या मध्यभागी बस अडकल्याने रात्री उशिरापर्यंत वाहतूक कोंडी झाली होती. पीएमपी प्रशासनाच्या अशा हलगर्जीपणामुळे सर्वसामान्यांचा जीव धोक्यात येत आहे. कात्रज चौकात दोन वर्षांपूर्वी अशाच प्रकारे बस ओढताना एका कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला होता, तरीही सुरक्षेच्या नियमांकडे दुर्लक्ष केले जात आहे.

नादुरुस्त बसची देखभाल आणि सुरक्षित टोईंग प्रक्रियेबाबत प्रशासनाने कठोर नियमावली करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे; अन्यथा, अशा घटनांमुळे मोठा अनर्थ घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.



कात्रज : अपघातग्रस्त पीएमपीएल बसखाली सापडलेल्या दुचाकी.

# राज्यातील तोलणारांचे सेवानिवृत्ती वय ६५ वर्षे

**पुणे, दि. १३ -** राज्यातील मार्केट यार्डातील तोलणार हे बाजार समितीचे कर्मचारी नसून ते अनुज्ञप्तीधारक घटक आहेत. त्यामुळे त्यांच्यावर वेगळी वयोमर्यादा लादणे अन्यायकारक असल्याचा मुद्दा मान्य करत शासनाने ६२ व्या वर्षी सेवा मुक्त करण्याच्या निर्णय रद्द केला. महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाच्या पाठपुराव्यानंतर आता हे वय ६५ वर्षे केले आहे.

९ मार्च २०२६ रोजी महामंडळाचे उपाध्यक्ष राजकुमार घायाळ, विकास मगदुम आणि सहचिटणीस हनुमंत बहिरट यांनी पणन संचालक, पुणे बाजार समितीला लेखी निवेदन सादर केले होते. दुरुस्तीनुसार ६५ वर्षांनंतरही वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र सादर करून हमाल, मापाड्यांना यांना काम करता येईल. यामुळे त्यांना स्थैर्य प्राप्त होईल असे हमाल मापाडी महामंडळाचे सहचिटणीस हनुमंत बहिरट यांनी सांगितले.